Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar – 431 004,
Maharashtra, India
NAAC Re-accredited 'A' Grade
Office : Academic Section
Office PBX : (0240) 24033900/400
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४,
महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Email : dyregistrar.acad@bamu.ac.in
acadsection@bamu.ac.in
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/संलग्न/२०२४-२५/ 1880-83 दि. २७-०६-२०२४.

**प्रति,**
**प्राचार्य,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

**विषय :- CAS योजने अंतर्गत अध्यापकांना पदोन्नती देण्यासाठी शिबिराचे आयोजन करणे संदर्भात अर्हताधारक अध्यापकांचे प्रस्ताव विद्यापीठास ऑनलाईन पध्दतीने सादर करणे बाबत.**
**संदर्भ :- १)** शिबिर आयोजित करणेबाबत महाराष्ट्र शासनाचे पत्र दिनांक ०८ जूलै, २०१९.
**२)** शिबिर आयोजित करणेबाबत मा. कुलगुरु महोदयांचे आदेश प्राप्त टिपणी दि. १८-०६-२०२४.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, CAS योजनेअंतर्गत अध्यादेश-९९३, शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ व विद्यापीठ अनुदान आयोग अधिसुचना दि. १८ जूलै, २०१८ अन्वये विहित केल्यानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नीत महाविद्यालयातील पात्र अध्यापकांना स्थान-११, स्थान-१२, स्थान-१३A व स्थान-१४ साठी पदोन्नती देणे संदर्भात शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे तद्अनुषंगाने सर्व संबंधित अध्यापकांनी प्राचार्यांच्या स्वाक्षरीने खालील कोष्टकात विनिर्धिष्ठित करण्यात आल्यानुसार **दि. ०६ जूलै, २०२४ पर्यंत विद्यापीठ संकेतस्थळावर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीनेच** सादर करण्यात यावे व त्यांची हार्डकॉपी प्राचार्यांच्या स्वाक्षरीद्वारे दिनांक ०८ जूलै, २०२४ पर्यंत विद्यापीठास सादर करावी, ही विनंती.

| अ.क्र. | अध्यापकाचे नाव | विषय | सध्याच्या स्थाननिश्चितीचा दर्जा (स्थान-११, स्थान-१२, स्थान-१३A व स्थान-१४) | पदोन्नतीसाठी पात्र असणारे स्थान (स्थान-११, स्थान-१२, स्थान-१३A व स्थान-१४) | यापूर्वी CAS योजनेअंतर्गत किंवा विद्यापीठाने दिलेल्या अध्यापक मान्यतेचे पत्र क्र. व दिनांक | नियामक २१६५/२०२१ अन्वये विहित केल्यानुसार प्रक्रिया शुल्क रुपये ३०००/- ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या संकेत स्थळावर भरणा केल्याबाबत पावती क्र. / चलन क्र व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त कोष्टकात विनिर्धिष्ठित करण्यात आल्यानुसार माहिती सादर करुन अध्यापक मान्यतेचे पत्र / CAS योजनेअंतर्गत मान्यतेचे पत्र व विहित शुल्कासह इतर तत्सम दस्ताऐवज सादर करुन विद्यापीठास निर्धारित तारखेस कार्यालयीन वेळेत विहित ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे, याची कृपया सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेण्यात यावी, ही विनंती.

**उपकुलसचिव**
(शैक्षणिक विभाग)

**प्रतिलिपी :**

१. **मा. सहसंचालक,** उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.
२. **मा. वित्त व लेखा अधिकारी,** लेखा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहिस्तव सादर.
३. या पत्राची एक प्रत **मा. संचालक,** युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात येवून विनंती करण्यात येते की, सदर पत्राची प्रत सर्व संबंधित महाविद्यालयांना त्यांच्या Affiliation Login व विद्यापीठ संकेतस्थळाच्या परिपत्रक विभागात उपलब्ध करण्यात यावी व वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार माहितीप्रमाणे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने स्विकारणेबाबत कार्यवाही करावी तसेच नियामक २१६५/२०२१ अन्वये विहित केल्यानुसार प्रक्रिया शुल्क भरणा करण्यासाठी सर्व संबंधितांना Link उपलब्ध करणेबाबत आपल्या स्तरावरुन यथायोग्य कार्यवाही करुन सदर शिबिरासाठी संकलित झालेली माहिती संकलित करुन शैक्षणिक विभागास सादर करण्यात यावी, ही विनंती.

**उपकुलसचिव**
(शैक्षणिक विभाग)